RNI No. MAHBIL /2009/31732

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-अ

वर्ष ७, अंक २९] गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर १८-२४, २०२१/ कार्तिक २७-अग्रहायण ३, शके १९४३ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### अन्न , नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ नोव्हेंबर २०२१.

### शुद्धीपत्र

**ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९.**

क्र. ग्रासंअ-२०२०/प्र.क्र.७८/ग्रासं-४.— महाराष्ट्र शासनाने अधिसूचना समक्रमांक दिनांक ३० सप्टेंबर २०२१ अन्वये ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ अंतर्गत जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग हे सोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार स्थापन केले आहेत.

या परिशिष्टातील अ.क्र.१ येथे " जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई शहर " **ऐवजी** " जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, मध्य मुंबई " व अ.क्र.२ येथे " जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई शहर अतिरिक्त " **ऐवजी** " जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, दक्षिण मुंबई " असे **वाचावे**.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विजय वाघमारे,**
शासनाचे सचिव.

## FOOD, CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 9th November 2021.

*CORRIGENDUM*

Consumer Protection Act, 2019.

No.Grasana-2020/C.R.78/CP-4.— The Government of Maharashtra *vide* Notification of even number dated 30th September 2021 has established District Consumer Disputes Redressal Commissions under Consumer Protection Act, 2019 as per Schedule appended.

In the Schedule, at Sr.No.1 should be *read* as "District Consumer Disputes Redressal Commission, Central Mumbai" *instead of* "District Consumer Disputes Redressal Commission, Mumbai City" and at Sr.No.2 should be *read as* "District Consumer Disputes Redressal Commission, South Mumbai" *instead of* "District Consumer Disputes Redressal Commission, Mumbai City Additional"

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIJAY WAGHMARE,
Secretary to the Government.

## अन्न , नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

मंत्रालय विस्तार, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १० नोव्हेंबर २०२१.

### अधिसूचना

**ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९.**

क्रमांक ग्रासंअ.२०२१/प्र.क्र.३३/ग्रासं-४.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ च्या कलम ४२ व ग्राहक संरक्षण (राज्य आयोग व जिल्हा आयोग अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्तीची पात्रता, भरतीची पद्धत, नियुक्तीची प्रक्रिया, पदाची मुदत, राजीनामा आणि अध्यक्ष व सदस्य यांना काढून टाकणे) नियम, २०२० च्या नियम ६ नुसार शासनास असलेल्या अधिकारांतर्गत न्या. श्री. पुखराज राजमल बोरा, उच्च न्यायालय, मुंबई (सेवानिवृत्त न्यायाधीश) यांची अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र या पदावर ते रुजू होण्याच्या दिनांकापासून आणि त्यांच्या वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत म्हणजे दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ पर्यंत दिनांक ४ जून, २०२१ च्या अधिसूचनेन्वये नियुक्ती केली आहे ;

आणि, ज्याअर्थी, न्या. श्री. पुखराज राजमल बोरा, अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग यांनी दिनांक १ नोव्हेंबर, २०२१ च्या पत्रान्वये राजीनामा दिला असून त्यांचे पद सोडण्यास शासनाची मान्यता देण्याची विनंती केली आहे ;

आता, त्याअर्थी, ग्राहक संरक्षण (राज्य आयोग व जिल्हा आयोग अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्तीची पात्रता, भरतीची पद्धत, नियुक्तीची प्रक्रिया, पदाची मुदत, राजीनामा आणि अध्यक्ष व सदस्य यांना काढून टाकणे) नियम, २०२० च्या नियम ७ च्या तरतुदी अन्वये त्यांचा राजीनामा महाराष्ट्र शासन मान्य करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुधीर तुंगार,**
शासनाचे सह सचिव.

## FOOD, CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 10th November 2021.

*NOTIFICATION*

CONSUMER PROTECTION ACT, 2019.

No.Grasana.2021/CR-33/CP-4.— Whereas, the Government of Maharashtra *vide* Government Notification dated 4th June, 2021 issued in exercise of powers conferred by section-42 of Consumer Protection Act, 2019 read with rule 6 of Consumer Protection (Qualification for appointment, method of recruitment, procedure of appointment, term of office, resignation and removal of the President and Members of State Commission and District Commission ) Rules, 2020 has appointed Justice Shri Pukhraj Rajmal Bora, retired Judge of the High Court, Bombay as President, State Consumer Disputes Redressal Commission Maharashtra with effect from date of joining the post and till attaining the age of 65 years that is on 21st October, 2022;

And whereas, Shri Pukhraj Rajmal Bora *vide* letter dated 1st November 2021 has submitted his resignation and requested to process the same to obtain the permission of the State Government for relinquishing his office ;

Now, therefore, Government of Maharashtra accepts his resignation under rule 7 of Consumer Protection (Qualification for appointment, method of recruitment, procedure of appointment, term of office, resignation and removal of the President and Members of State Commission and District Commission) Rules, 2020.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SUDHIR TUNGAR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.